3 1 AUG 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तृतीयपंथीय सक्षमीकरणाची जबाबदारी समाजाची

- कुलगुरू डॉ. कामत यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात तृतीयपंथीय कल्याण हक्क संरक्षण कायदा कार्यशाळा

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

संवाद व जनजागृतीच्या माध्यमातून तृतीयपंथीयांचे मुख्य प्रवाहात समावेशन करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे. हा समाज उपेक्षित नव्हे, तर समाजाचा अविभाज्य घटक असून त्यांचे हक्क व सक्षमीकरणाची जबाबदारी समाजाची आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय व शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथीय कल्याण, हक्क व संरक्षण कायदा २०१९ व सुधारित नियम २०२०" यांच्या अंमलबजावणीसंदर्भात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी समाजकल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रेश्मा पाटील, शासनाच्या तृतीयपंथी हक्क कल्याण समिती सदस्य मयुरी आळवेकर व शिवानी गजबर यांची



कोल्हापूर : उदूघाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. कामत.

प्रमुख उपस्थिती होती.

पूरस्थितीत बोट चालविणे, बचावकार्य व प्रथमोपचारासाठी प्रथमच तयार केलेली तृतीयपंथीयांची आपत्ती व्यवस्थापन टीम सक्षम आहे. समाजाकडून अनेकदा उपेक्षा सहन करावी लागलेल्या समुदायाने संकटकाळात इतरांच्या जीवितरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे, हे सामाजिक समावेशाचे प्रभावी उदाहरण आहे असल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हास्तरीय तृतीयपंथी हक्क व तक्रार निवारण समिती सदस्य शिवानी गजबर यांनी 'तृतीयपंथी समजून घेताना" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर 'तृतीयपंथी कायदे व धोरणांबाबत सामाजिक जागृती" या विषयावर अविनाश भाले यांनी मार्गदर्शन केले. मयुरी आळवेकर यांनी, समाजाने तृतीयपंथीयांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घ्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी मनोगत व्यक्त केले. समाजकल्याणचे तालुका समन्वयक सचिन परब यांनी सूत्रसंचालन केले, समाजकल्याण अधिकारी अक्षय कुरणे यांनी आभार मानले. यावेळी पोलीस अधिकारी अंजली केसरकर, डॉ. किशोर खिलारे, डॉ. दीपक भोसले, डॉ. सरोज बीडकर आदी उपस्थित होते.

3 1 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. मंचावर डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. ज्योती खराडे.

# महिलांच्या हक्क, सुरक्षिततेची गरज

■ प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर :** महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून शिक्षण, विज्ञान–तंत्रज्ञान, रोजगार आणि समाजातील विविध क्षेत्रांत पुढे यावे, यासाठी महिलांच्या हक्क, संधी, सुरक्षितेवर भर देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थिनी वसतिगृह आणि स्वयंसिद्धा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित `She Talk` उपक्रमात त्या बोलत होत्या. डॉ. जाधव म्हणाल्या, महिलांना उपलब्ध असलेल्या विविध संधी, सुविधा, हक्क आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे महिलांनी उपलब्ध संधींचा केवळ लाभ न घेता स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मनिर्भर होण्याची दिशा स्वीकारावी, असे आवाहनही डॉ. जाधव यांनी केले.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धा' ॲपची माहिती दिली. महिलांनी केलेले उपक्रम, मिळविलेले यश तसेच महिलांनी सामूहिकपणे राबविलेले उल्लेखनीय उपक्रम या माध्यमातून इतरांपर्यंत पोहोचविता येत असल्याचे सांगितले. विद्यार्थिनी वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षणासाठी असलेल्या कायद्याबाबत मार्गदर्शन केले. साक्षी धनावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्योती खराडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कविता वड्राळे, डॉ. मीना पोतदार, विद्यार्थिनी वसतिगृहातील कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 AUG 2026

लोकमत

# विद्यापीठात तासभर रंगले अभिवाचन, 'चंद्रपूरच्या जंगलात'ला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागात 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाच्या अभिवाचनाला विद्यार्थ्यांसह नाट्यरसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नाट्यक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या 'अवकाश'चे हे सादरीकरण उपस्थितांची दाद मिळवून गेले. ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांच्या कलेवर कलाकृतीचे अभिवाचन सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी यांनी केले, तर दिग्दर्शन हृदयनाथ जाधव यांनी केले.

प्रयोगानंतर जाधव आणि दळवी यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अनुप जत्राटकर यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. साक्षी वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण पांढरे यांनी आभार मानले. डॉ. तृप्ती करेकट्टी, अविनाश भाले, शरद आजगेकर, डॉ. प्रमोद कसबे, विकास कांबळे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभागात 'चंद्रपूरच्या जंगलात...' या नाटकाचे समीर दळवी आणि हृदयनाथ जाधव यांनी अभिवाचन केले.

जनसंपर्क कक्ष

3 1 AUG 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘चंद्रपूरच्या जंगलात’ अभिवाचनाला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे लिखित ‘चंद्रपूरच्या जंगलात...’ या नाटकाच्या अभिवाचनाला विद्यापीठात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे तासभर चाललेल्या अभिवाचनाने उपस्थितांना खिळवून ठेवले.

शिवाजी विद्यापीठ बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि एन. अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रॉडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नाट्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या ‘अवकाश’च्या या सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळवली. अभिवाचक समीर दळवी व दिग्दर्शक हृदयनाथ जाधव यांनी प्रभावी सादरीकरणातून कलाकृती रंगमंचावर जिवंत केली. अनुप जत्राटकर यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. साक्षी वाघमोडेने सूत्रसंचालन केले. प्रवीण पांढरे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ‘चंद्रपूरच्या जंगलात’चे अभिवाचन करताना हृदयनाथ जाधव व समीर दळवी. (छाया : मिलन मकानदार)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 AUG 2026
तरुण भारत

# 'चंद्रपूरच्या जंगलात' अभिवाचनाला प्रतिसाद

प्रतिनिधी,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि 'एन अनुप जत्राटकर मल्टीमीडिया प्रॉडक्शन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चंद्रपूरच्या जंगलात" या नाटकाच्या अभिवाचनाला शिवाजी विद्यापीठात मोठा प्रतिसाद मिळाला. नाट्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या 'अवकाश" चे हे सादरीकरण उपस्थितांची वाहवा मिळवून गेले.

ज्येष्ठ लेखक विक्रम वाटवे यांची कलाकृती रंगमंचावर जिवंत करण्याचे काम सुप्रसिद्ध अभिवाचक समीर दळवी आणि दिग्दर्शक हृदयनाथ जाधव यांनी केले. कार्यक्रमानंतर दिग्दर्शक हृदयनाथ जाधव आणि समीर दळवी यांच्याशी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी संवाद साधला.

अनुप जत्राटकर यांनी स्वागत केले. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. प्रवीण पांढरे यांनी आभार मानले. यावेळी इंग्रजी विभागाच्या डॉ. तृप्ती करेकट्टी, अविनाश भाले, शरद आजगेकर, डॉ. प्रमोद कसबे, विकास कांबळे, डॉ. सुमेधा साळुंखे, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 AUG 2026
तरूण भारत



आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्या.

# आदिवासींच्या राख्यांना विद्यापीठात प्रतिसाद

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांनी बांबूपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचा प्रसार, प्रसिद्धी व विक्रीच्या कामी शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसिद्धाच्या माध्यमातून आणि यु.जी.सी. स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटी केंद्राकडून मोठा हातभार लाभला. राबविलेल्या या उपक्रमांतर्गत सुमारे ४५०० रुपयांच्या राख्यांची विक्रीही करण्यात आली. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रमही घेण्यात आला.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'सेवा विवेक" ही संस्था अग्रेसर आहे. तेथील आदिवासी महिलांनी बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू तयार केलेल्या आहेत. पर्यावरणपूरक आणि आकर्षक पर्याय म्हणून बांबूच्या राख्यांकडे पाहिले जाते. महिलांना स्वयंरोजगारातून सक्षमीकरण करण्यासाठी, त्या महिलांनी तयार केलेल्या राखी विकत घेऊन त्यांच्या या कार्याला विद्यापीठामध्ये 'स्वयंसिद्धा" केंद्राच्या सहकार्यातून हातभार लावण्यात आला. या राख्या विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालयांतील विद्यार्थिनी, कर्मचाऱ्यांनी विकत घेतल्या. विद्यापीठातील स्वयंसिद्धाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, दीप्ती कांबळे यांनी या उपक्रमास विशेष योगदान दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 AUG 2026
पुण्यनगरी

# संविधानातील बंधुता मूल्य सर्वोच्च

**भन्ते डॉ. यश काश्यपायन**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे असून, त्यातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरून कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे विचार आणि कार्य वेगवेगळे न पाहता त्यातील सकारात्मक विचारांची सांगड घालण्याची गरज आहे. धम्माचे अभ्यासक अमित मेधावी यांनी, पाली, मागधी आणि संस्कृतसारख्या प्राचीन भाषांचा अभ्यास केल्याशिवाय प्राचीन भारताचे ज्ञान आणि धम्मातील मूळ अर्थ समजणे अशक्य असल्याचे सांगितले.

यावेळी विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शशिकांत कांबळे, सुरेखा नरदे, विजय कुशाण, नेहा विटेकरी, सुप्रभा चोपडे, सिद्धार्थ दीक्षित, समर्थ भारतीय, डॉ. बालाजी लातुरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुलवीर कांबळे, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. कपिल राजहंस, ॲड. करुणा मिणचेकर, अनिल वेटम, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. तेजपाल मोहरेकर उपस्थित होते. प्रास्ताविक संचालक डॉ. पवन गायकवाड, सूत्रसंचालन सागर कांबळे यांनी केले.

'लोकमत'च्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## एम. बी. ए. विभाग

## वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग

Estd. : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

(AICTE Approved and Recognized by DTE, Govt. of Maharashtra Inst. Code : 6002)

**एम.बी.ए. आणि बी.बी.ए./एम.बी.ए. Integrated प्रवेश २०२६-२०२७; संस्थास्तरीय प्रवेश फेरी**

एम.बी.ए. विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमध्ये एम.बी.ए. आणि बी.बी.ए./एम.बी.ए. Integrated अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर संभाव्य रिक्त जागांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**एम.बी.ए. शैक्षणिक अर्हता : MAH-MBA / MMS CET 2025 conducted by State Common Entrance Test Cell, Maharashtra State/CAT/CMAT/MAT/ GMAT/ATMA** यांपैकी कोणतीही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. (विद्यार्थ्यांनी विभागामध्ये अर्ज दि. ७ सप्टेंबर, २०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.)

बी.बी.ए./एम.बी.ए. **Integrated** शैक्षणिक अर्हता : **MAH-BCA/BBA/BMS/BBM CET '2025 conducted by State Common Entrance Test Cell, Maharashtra State** प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. (विद्यार्थ्यांनी विभागामध्ये अर्ज दि. ८ सप्टेंबर, २०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.)

| | |
|---|---|
| गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. | 09/09/2026 up to 3.00 p.m. |
| स्पॉट राऊंड प्रवेश | 10/09/2026 at 10.30 a.m. |

अधिकच्या माहितीसाठी विद्यार्थ्यांनी www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर भेट द्यावी अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा. ०२३१ - २६०९३६४, २६०९३७५.

दिनांक : ३१/०८/२०२६

मा. कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर